# वाघाची रीतिनीती

## रॉबिन जेनसन यांच्याद्वारे लिखित गोष्ट

*चीनी राशिचक्र हे बारा वर्षांचे चक्र असते, ज्याची पुनरावृत्ती होत राहते. एक पशू प्रत्येक वर्षाचा प्रतीक असतो आणि असे म्हटले जाते की, त्या वर्षी जन्मलेले लोक त्या पशूच्या गुणांना प्रतिबिंबित करतात.*

*वर्ष २०२२ मध्ये, चांद्रतिथीनुसार, चीनी नववर्ष मंगळवार, १ फेब्रुवारी रोजी साजरे केले जाणार आहे, जे चीनी राशिचक्रातील तिसरे वर्ष आहे आणि याचे नाव 'व्याघ्रवर्ष' म्हणजे 'वाघाचे वर्ष' असे आहे.*

*चीनमध्ये वाघाला सर्व प्राण्यांचा राजा म्हणून गौरविले जाते; त्याला त्याच्या बळासाठी, पराक्रमासाठी, शक्तिसामर्थ्यासाठी आणि शौर्यासाठी मान दिला जातो. त्याच प्रकारे, असे मानले जाते की, व्याघ्रवर्षात जन्मलेले लोक पराक्रमी व शूर असतात आणि ते आत्मविश्वासपूर्ण असतात; त्याचबरोबर ते धैर्य, नेतृत्व, मित्रत्व आणि मोहकता या गुणांनीदेखील संपन्न असतात.*

दाराजवळील खुंटीवर अडकवलेल्या दोन मोठ्या बादल्या काढून घेत तो नवयुवक पाणी आणण्यासाठी गावाच्या शिवेकडे लगबगीने निघाला होता. बादल्यांच्या वजनामुळे त्याचे स्नायू ताणले गेले होते; अंगाची लाहीलाही करणाऱ्या दुपारच्या ऊष्म्यात, फाशांचा खेळ खेळत असलेल्या राजाच्या सैनिकांना पाणी पोहोचवण्याचे काम त्याला दिले गेले होते.

रस्त्यावरून जात असताना त्याला सैनिकांची दुसरी एक तुकडी दिसली, जी राजाने लावलेल्या कराची वसूली करण्यासाठी गावकऱ्यांचे धान्य बळजबरीने जप्त करत होती. गावकरी याचना करत होते की, त्यांच्यापाशी आपल्या कुटुंबीयांना खावू घालण्याइतपतही धान्य शिल्लक नाही; हे सर्व पाहून नवयुवकाला खूप दुःख होत होते. पण तिथे तर दयेमायेला थाराच नव्हता. ज्या राजाने हे कर लादले होते तो एक क्रूर, जुलमी राजा होता; त्याच्या शासनात लोकांची उपासमार होत होती. एकेकाळी समृद्ध असलेल्या त्या गावाला, आता या राजाच्या शासनाखाली कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते आणि गावाच्या ध्वजावर अंकित असलेला, लोकांच्या जोशाचे प्रतीक

असणारा महाशक्तिशाली वाघ, जो एकेकाळी पराक्रमाची प्रेरणा देत असे; तो आता भयाची भावना जागृत करत होता.

त्या नवयुवकाचे हृदय क्रोधाग्नीने धगधगले, आणि त्याने प्रतिज्ञा केली की, तो त्याच्या कुटुंबीयांच्या आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या या व्यथेचा अंत करेल. फक्त त्याने प्रयत्नांची शर्थ करून ‘टायगर माउंटन’ [वाघाचा डोंगर]च्या शिखरावर पोहोचायला मात्र हवे! अयनदिन आला होता; आज रात्री त्याच्याकडे चांगली संधी होती!

आयुष्यभर त्याच्या आजीने त्याला वाघाची गोष्ट ऐकवली होती, ती ही की, प्रत्येक बारा वर्षांनंतर, उन्हाळ्यातील अयनदिनाच्या पूर्वसंध्येला गावातील नवयुवक त्या विशाल पांढऱ्याशुभ्र वाघाच्या शोधात कशा प्रकारे तो पावन डोंगर चढून जात असत. ज्या कोणाची वाघाशी गाठ पडे आणि जो कोणी त्या हिंस्र प्राण्याची एखादी निशाणी जसे की, त्याचा एखादा दात, त्याच्या मिशीचा केस, अगदी त्याच्यामुळे पडलेला एखादा ओरखडादेखील प्रतीक म्हणून घेऊन येत असे तो राजाधिकारी बनू शकत होता आणि “वाघाच्या संमतीने” गावावर शासन करू शकत होता. त्याच्या आजीने त्याला सांगितले होते की, पूर्वीच्या काळातील नेतृत्वकर्ते त्या महाबलशाली प्राण्याचे आवाहन करत असत आणि शासन करण्यात मार्गदर्शन मिळवण्यासाठी कल्याणकारिता, पराक्रम आणि बळ अशा त्याच्या अद्वितीय गुणांचा अंगीकार करत असत.

वाघाची ती गोष्ट खरी मानून आज रात्री तो नवयुवक आपल्या जीवनाची बाजी लावणार होता. या दैवी प्राण्याचे दर्शन घेतलेला एकही मनुष्य जरी सध्या हयात नव्हता, तरी नवयुवकाच्या आजीसह गावातील वयोवृद्ध गावकरी निःसंदेह हा विश्वास बाळगून होते की, तो वाघ सतर्कतेने त्यांच्या लोकांचे रक्षण करतो आहे. *मला त्या वाघाला शोधून काढलेच पाहिजे, अन्यथा आम्हा सर्वांचा नाश होईल,* त्या नवयुवकाने विचार केला.

यश प्राप्त करण्याच्या दृढनिश्चयाने, तो पहारेकऱ्यांची अदलाबदल होत असताना चोरपावलांनी निसटला, कारण आता राजाच्या हुकुमानुसार ‘टायगर माउंटन’ चढण्यास सक्त मनाई होती. चाकू, मशाल व आजीचे आशीर्वाद घेण्यासाठी तो त्या लहानशा झोपडीकडे त्वरेने गेला, जिथे तो आपल्या आजीसह राहत होता.

त्याने आपली योजना तिला सांगितल्यावर दोघेही काही क्षण स्तब्धपणे उभे राहिले—त्याच्या निर्णयाचे गांभीर्य वातावरणात जाणवत होते.

त्या दयाळू वृद्धेने आपल्या नातवाच्या चेहऱ्यावर प्रेमाने हात फिरवला आणि ती दृढतेने म्हणाली, “बाळ, आता शौर्य गाजवण्याची वेळ आली आहे.” हास्यवदनासह तिने त्याला सांगितले, “लक्षात ठेव, जो हृदयाने योद्धा असतो, तोच सच्चा योद्धा असतो. हिंमत ठेव!” तिने त्याला घट्ट मिठी मारली आणि म्हणाली, “माझा आशीर्वाद सदैव तुझ्यासोबत आहे. देव करो, तुला वाघाचे दर्शन होवो!” मग तिने अभिमानाने आपल्या नातवाकडे पाहिले जो त्याची जळती मशाल घेऊन जंगलात दिसेनासा झाला.

त्याचा प्रवास कष्टप्रद होता. जेव्हा त्या युवकाने डोंगर चढायला सुरुवात केली, तेव्हा राजाच्या आणि त्याच्या सैनिकांच्या क्रूरतेप्रति असलेला त्याचा क्रोध काही अंतरापर्यंत त्याला चेतवत राहिला. तो झाडाझुडपांना पायाखाली तुडवत व आपल्या चाकूने वेलींना सपासप तोडत वेगाने पुढे जात होता, जणूकाही त्याचा प्रत्येक प्रहार, त्याला आणि इतर गावकऱ्यांना जबरदस्तीने सहन कराव्या लागणाऱ्या भयानक जुलमाला कुठल्या ना कुठल्या प्रकारे समाप्त करेल.

स्वतःच्या क्रोधाच्या जोरदार आक्रमणापुढे त्या नवयुवकाला, वाऱ्याचा वा झाडाझुडपांचा विलाप अथवा भयग्रस्त लहानग्या प्राण्यांनी लगबगीने केलेल्या पलायनाचा आवाज, यांपैकी काहीच ऐकू येत नव्हते.

शेवटी तो थांबला, आतापर्यंत त्याचा राग काहीसा शांत झाला होता आणि त्याच्यातील आवेश कमी झाला होता. त्याने आसपास नजर टाकली आणि त्याला दिसल्या—लोंबकळणाऱ्या तुटलेल्या फांद्या आणि तो उजाड खडबडीत रस्ता, ज्यावर तो इतका उपद्रव करत, उग्रपणे वाट आखत चालला होता. हे सर्व पाहून त्याला खूप पश्चात्ताप झाला. त्याने विचार केला, *क्रोधामुळे मी इतक्या साऱ्या झाडाझुडपांना दुखापत केली आहे. आणि त्यातून काय साध्य झाले? पुढे जाण्याची ही रीत नव्हेच!*

तो तिथेच गुडघ्यांवर बसला. धरणीमातेची क्षमा मागत, त्याने आपला चाकू धरणीला अर्पण केला आणि चाकू तिथेच जंगलात सोडून तो पुढे निघाला. त्याने प्रार्थना केली, *मला योग्य दृष्टी मिळावी. . . जेणेकरून मी खऱ्या कल्याणकारी दृष्टीने पाहू शकेन.*

आता, तो नवयुवक लक्षपूर्वक, निरीक्षण करतकरत पुढे जाऊ लागला—त्याच्यासमोर जे काही येत होते, ते तो सावधपणे पाहत होता, झाडाझुडपांमधून जाताना त्याला जसजसा नैसर्गिक रस्ता दिसे, तसतसा त्यावर चालतचालत तो डोंगरमाथ्याकडे वाटचाल करत राहिला.

काही वेळानंतर त्याला जाणवले की, त्याने एखाद्या मऊ गोष्टीवर पाय ठेवला आहे. विझत चाललेल्या मशालीचा मिणमिणता प्रकाश पुढे आणत तो खाली वाकला आणि त्याने जमिनीकडे अगदी निरखून पाहिले. खाली पाहताच भितीने त्याचा थरकाप उडाला, कारण तिथे खाली, मऊ गवतावर भल्यामोठ्या पंजाचा ठसा होता. तो वाघाच्या पंजाचा ठसा असेल का? आणि तेवढ्यातच, त्याची मशाल विझली आणि तो मिट्ट अंधारात बुडाला. भयाने त्याचे शरीर गारठून गेले.

जंगलातील कर्कश आवाज सहन करण्यापलीकडे वाढले होते आणि त्याचे विचार सैरावैरा धावत होते : *वाघ आला तर मी काय करू? माझ्याकडे तर चाकू नाही, मशालही नाही, मी अगदी निःशस्त्र आहे. वाघाने माझ्यावर हल्ला केला तर?* प्रत्येक आवाज आणि पानाची सळसळ संभाव्य संकटाचे सूचक वाटू लागली होती. त्याला नीट श्वासही घेता येत नव्हता. त्याने घाबरून वर पाहिले आणि त्याला दिसला, चंद्राचा हलकासा धवलप्रकाश आणि त्याला त्याच्या आजीचे प्रोत्साहित करणारे बोल ऐकू आले. “जो हृदयाने योद्धा असतो, तोच सच्चा योद्धा असतो. हिंमत ठेव!”

तिच्या शब्दांनी प्रेरित होऊन साहस एकवटत त्या युवकाने डोंगर चढण्यास सुरुवात केली. त्याने प्रार्थना केली, *मला योग्य त्या पद्धतीने ऐकू येवो आणि मला पराक्रम प्राप्त होवो.* कित्येक तास गेले, तो पुढे चालत राहिला. चालताचालता, जी पाने त्याच्या शरीराला घसटून जात होती, त्यांमधून त्याला आता त्याच्या आजीचा आवाज प्रतिध्वनीत होताना ऐकू येत होता. ती पाने कुजबुजत होती, *हिंमत ठेव, आम्ही तुझ्यासोबत आहोत.* आता त्याचा श्वासोच्छ्वास सहजतेने होऊ लागला. त्याचे हृदयदेखील सुखावले. आता तो जंगलातील ध्वनींना एका अडथळ्याच्या रूपात नव्हे, तर एका मित्राच्या, सहयोग्याच्या रूपात ऐकू लागला. प्रत्येक पावलागणिक त्याला आश्वासन मिळत होते आणि वाघाला शोधण्याचा त्याचा निर्धार अधिकच बळकट होत चालला होता.

त्याने स्वतःची गती वाढवली. तो जसजसा भराभर डोंगर चढू लागला, तसतसा त्याच्या अंतरी आनंद आणि आल्हादाचा भावही ओसंडून वाहू लागला. त्याला आणखीनच धाडस जाणवू लागले. त्याच्या मनात विचार आला, *मी हे खरोखरच करतो आहे. मी खरोखरच एक योद्धा आहे! मी परतल्यावर, माहीत नाही की सर्वजण माझी कशा प्रकारे प्रशंसा करतील. माझा आदरसत्कार केला जाईल. कदाचित मी राजाही बनेन!* हे असेच सुरू राहिले, त्याच्या मनात स्वतःच्या प्रशंसेचे विचार घोळत राहिले. स्वतःवरच खूश होऊन, तो मोठमोठ्याने हसू लागला. भविष्यात प्राप्त होणाऱ्या प्रशंसेच्या विचारांनी तो इतका विचलित झाला की, मार्गातील एका लाकडाच्या ओंडक्याला अडखळून तो खाली तोंडावर पडला.

त्याच क्षणी, त्याला एक गगनभेदी डरकाळी ऐकू आली, तिचा आवाज इतका मोठा होता की, त्याने त्या युवकाच्या अहंकारी स्वप्नाळू दुनियेला अक्षरशः हलवून सोडले—मेघगर्जनेच्या गडगडाटासम असलेल्या त्या डरकाळीने त्याच्या हाडांनादेखील हादरवून टाकले आणि त्याला वर्तमान क्षणामध्ये आणून सोडले. नवयुवकाला काहीही दिसत नव्हते, पण त्याने हे जाणले होते की, वाघ जवळपासच कुठेतरी आहे. तो वाघाच्या संरक्षणाच्या छत्रछायेखाली येऊ इच्छित होता, त्याने हृदयपूर्वक प्रार्थना केली, *मी खऱ्या विनम्रतेच्या बळासह योग्य रीतीने तुमची पूजा करावी.*

तो उभा राहिला आणि सावधपणे पुढे चालू लागला, त्याचा श्वासोच्छ्वास स्थिरपणे होऊ लागला होता आणि त्याचे केंद्रण उद्दिष्टावर दृढ होते. आता तो डोंगरमाथ्याच्या अगदी जवळ पोहोचला होता आणि त्याची प्रत्येक हालचाल मोलाची होती. त्याने अखेरचे एक पाऊल टाकले अन् तो घनदाट जंगलाला पार करून सुदूर पसरलेल्या एका विस्तीर्ण मैदानात आला. आकाशाचा अनंत विस्तार चंद्रकिरणांचा वर्षाव करत होता आणि त्या उज्ज्वल प्रकाशात सर्वकाही उजळून निघाले होते.

त्याने चांदण्याच्या उजेडामध्ये सभोवताली पाहताच त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्याला दिसले की, ती जागा सर्व बाजूंनी झाडांनी वेढलेली आहे आणि प्रत्येक फांदीवर—पानापानावर—वरपासून खालपर्यंत, लहानमोठे, प्रत्येक आकाराचे, रूपाचे आणि रंगाचे प्राणी बसलेले होते, काही लटकलेले होते अथवा आडवे पडले होते. जंगलाचे सर्व प्राणी एका मौन सभेत एकत्रित झाले होते. ते त्याच्याकडे निरागसपणे एकटक पाहत होते.

आणि तिथेच, मैदानाच्या मधोमध बसला होता, महामहिमावान आणि दिमाखदार, विशाल पांढराशुभ्र वाघ—असीमित वैभवाचे, प्रचंड सामर्थ्याचे, स्थिरतेचे व शांतीचे प्रकटरूप. त्याचे केसाळ कातडे चंद्रप्रकाशात पांढऱ्याशुभ्र संगमरवराप्रमाणे चमकत होते. त्या वाघाच्या डोळ्यांतील तेज युवकाच्या अस्तित्वाला भेदून थेट त्याच्या अंतरी प्रवेशले.

त्या वाघाची दृष्टी अशी काही होती की, तसा अनुभव युवकाला याआधी कधीच आला नव्हता. त्याची सर्व दुर्बलता नाहीशी झाली; सर्व संशय दूर झाला. महाप्रशांतीची भावना त्याच्यातून ओसंडून वाहू लागली. पराक्रम आणि विश्वास या भावनांनी विस्तारित झाल्याचे त्याला जाणवले—स्वतःवरील त्याचा विश्वास आणि स्वतःच्या अंतरी तो जो कोणी होता त्यावरील विश्वास.

त्याचा हात आपसूकच त्याच्या हृदयाकडे वळला. त्याने आपले डोळे मिटले आणि आदराने व कृतज्ञतेने आपले मस्तक झुकवले. बराच काळ तो याच स्थितीत होता, आपल्या मनश्चक्षूंनी तो वाघाचे दर्शन घेत राहिला, त्याच्या सान्निध्यात स्नान करीत राहिला आणि वाघाचे गुण अनुभवत

राहिला—वाघाची कल्याणकारिता, पराक्रम आणि बळ—जे आता त्या युवकाच्या अंतरी दीप्तिमान झाले होते.

जेव्हा त्याने नजर उचलून वर पाहिले, तेव्हा वाघ निघून गेला होता. त्याने सभोवताली पाहिले, तर जंगलातील त्या मोकळ्या जागी तो एकटाच होता. त्याला स्वप्नामध्ये हा दृष्टांत झाला होता का? किती वास्तव वाटले होते ते सर्वकाही! त्याच्या हृदयातील ती भावना अजूनही तशीच होती—आणि ती खरी *होती.* आनंद आणि एक नवीन उद्दिष्ट यांच्या जाणीवेने तो व्यापून गेला. निश्चितच, आता तो आपल्या गावाला वाचवू शकणार होता.

*पण थांब!* त्याने विचार केला, *माझ्याकडे तर वाघाच्या मिशीचा केस नाही, त्याचा दातही नाही किंवा माझ्या अंगावर वाघाची एखादी खूणही नाही.*

परंतु, त्या पावन वाघाच्या दर्शनामुळे त्याला आशीर्वाद प्राप्त झाला नव्हता का? गहन मौनात त्यांनी हृदयाद्वारे संवाद साधला नव्हता का?

त्याला माहीत होते की, त्याने आता काय करावे. . .

तिथे खाली राजधानीमध्ये एका चौकात, जुना राजा आपल्या सभोवतालच्या सैनिकांच्या सामर्थ्याच्या बळावर, जमावापेक्षा उंचावर असलेल्या एका सोनेरी सिंहासनावर आसनस्थ होता व सैनिकांच्या तलवारी निःशस्त्र गावकऱ्यांवर उगारलेल्या होत्या. उपहासपूर्ण हास्यासह राजा म्हणाला, “या अयनदिनाच्या वेळी मला आव्हान देण्याची हिंमत असणारा इथे कोणी आहे का?” अस्वस्थ करणाऱ्या भायण शांततेत जमाव उभा होता. “मला नाही वाटत!” राजा म्हणाला.

“थांबा!” जमावाच्या मागून एक आवाज आला. “मी पाहिले आहे वाघाला! मी डोंगर चढून वर गेलो होतो आणि मी त्याला पाहिले आहे जो तिथे राहतो. वाघाचा आदेश मिळवल्याचा दावा मी करतो आहे!”

गावकरी अवाक झाले आणि असे जो बोलतो आहे तो कोण आहे, हे पाहण्यासाठी ते सर्वजण मागे वळून पाहू लागले.

तो युवक पुढे आला, नवप्राप्त शक्ती आणि अधिकार यांमुळे त्याच्या डोळ्यांत चमक दिसत होती.

युवकाला पाहून राजाचे हास्य तुच्छतादर्शक झाले. “अस्सं काऽ ऽ!” राजा म्हणाला. “तू तर अजून एक बालक आहेस! आणि मला तुझ्या अंगावर एकही खूण दिसत नाही. आम्हाला खूण दाखव—की तुझ्याकडे काही पुरावाच नाही?”

वाघाच्या प्रतिमेचे स्मरण करत आणि ती प्रतिमा स्वतःच्या अंतरी सामावून घेत तो युवक लांब पावले टाकत जमावापुढे आला. राजाकडे पाहून तो म्हणाला, “आम्ही एक आहोत. मी त्याला पाहिले आहे.”

आता राजा भयभीत झाला, त्याला युवकाच्या डोळ्यांत असे काही दिसले ज्यामुळे तो घाबरला. जुना राजा त्वरित उभा राहिला आणि ओरडला, “घेऊन जा या बंडखोर माणसाला इथून! याने राजाज्ञेचे उल्लंघन करून डोंगर चढण्याचा अपराध केला आहे!”

आपापले भाले सरसावत सैनिक पुढे आले, परंतु वाघ त्यांच्यापेक्षाही चपळ होता—वीजेपेक्षाही जलद. त्या विशाल पांढऱ्याशुभ्र वाघाने—‘टायगर माउंटन’च्या त्या महामहिमावान प्राण्याने—सैनिक आणि युवक यांच्यामध्ये झेप घेतली, त्याने आपले तीक्ष्ण पंजे राजावर उगारले आणि इतक्या मोठ्याने डरकाळी फोडली की, तिचा प्रतिध्वनी गावाच्या सीमारेषेपर्यंत पसरला. भीतीने लटलट कापणाऱ्या सैनिकांनी आपापली शस्त्रे तिथेच टाकून दिली व त्यांनी गावातून पळ काढला आणि तो जुना राजा जो अंग चोरून सिंहासनामागे लपला होता, तो इतका दूर पळून गेला, की परत कधी कुणाच्या दृष्टीसही पडला नाही.

युवक सिंहासनावर आसनस्थ होण्यासाठी पुढे सरसावला. आपल्याला ज्ञात असणारा आणि ज्याच्यावर आपण प्रेम करतो, तो युवक आपला राजा बनतो आहे हे पाहून गावकरी आश्चर्यचकित झाले व आनंदाने, कौतुकाने त्याच्याकडे पाहत राहिले. तो पावन वाघ त्याच्या पायापाशी बसला आणि त्याने आपल्या मिशीचा एक लांब केस त्या युवा राजाला बहाल केला. आणि मग तो महामहिमावान पांढराशुभ्र वाघ जितक्या वेगाने आला होता, तितक्याच चपळतेने गावाकाठच्या जंगलात नाहीसा झाला.

सर्व गावकरी स्वयंस्फूर्तीने जयजयकार करू लागले, त्यांच्या हृदयातून आनंदाची गीते उस्फूर्तपणे बाहेर पडू लागली. युवा राजाने घोषणा केली की, धान्याचे व औषधी वनस्पतींचे शाही भांडार उघडले जावे आणि ती सामुग्री लहानथोर अशा सगळ्यांना वाटण्यात यावी. मग त्याने स्पष्ट व बुलंद, निनादणाऱ्या आवाजात घोषणा केली की, “वाघाची रीतिनीती पुन्हा स्थापित झाली आहे!”

©२०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.